MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Multilingual Research Journal
Issue-44, Vol-01, Oct. to Dec. 2022

Editor
Dr.Bapu G. Gholap



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Oct. To Dec. 2022
Issue 44, Vol-01

Date of Publication
01 Oct. 2022

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) Philosophy of Brahmavihâra in Buddhism
**VO QUANG VINH & Dr. Alok Kumar Verma, Meerut, Uttar Pradesh, India** ||62

15) CO-RELATION OF KHO -KHO PLAYING ABILITY WITH HEALTH RELATED FITNESS ...
**Dr.Shraddha Shree Yadav & Dr. Jitendra Kumar, Moradabad U.P.** ||67

16) COMPARATIVE ANALYSIS OF TRENDS OF HUMAN DEVELOPMENT INDEX (HDI) OF ...
**Mr. Vitthal Tukaram Thabbe & Miss. Vaishnavi Bhosale, Kolhapur** ||71

17) त्रिपिटक साहित्यातील मिथकांचा अभ्यास - एक अध्ययन
**रेणुका बाबुराव आचार्य & प्रा. डॉ. बालाजी गव्हाळे, जि. परभणी** ||77

18) मृदा संवर्धनाविषयी शासनाची भूमिका : एक अभ्यास
**डॉ.बी. बी. बोबडे, ता. जि. बीड (महाराष्ट्र)** ||80

19) सर्वांगिन स्वास्थ व विकासाचे प्रमुख स्तोत्र योग व प्राणायाम
**प्रा.कुमुद व्ही. चारमोडे, जि.नागपूर, महाराष्ट्र** ||82

20) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक सुधारणा
**प्रा.डॉ. दहिकांबळे एस.डी., उमरी** ||87

21) राजर्षी शाहू महाराज यांचे शेती विषयक विचार
**प्रा.डॉ. भिक्खु एम. सत्यपाल & संगिता बापूराव धनेधर, औरंगाबाद** ||90

22) त्रिपिटक साहित्यामध्ये बुद्धकालीन भारतीय जीवन
**प्रा. डॉ. भिक्खू एम. सत्यपाल स्थवीर & ढिवरे वैशाली देवराम, औरंगाबाद** ||94

23) नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जागी ।
**प्रा. डॉ. कालिदास गुडदे, जि. परभणी** ||98

24) मराठी कादंबरीतील उच्च शिक्षित स्त्रीचे चित्रण
**प्रा अंशुमती राजेंद्र काहाणे, जि. अमरावती** ||99

25) थाट मारवा – तोंडी भैरवी
**प्रा.डॉं.जयश्री विश्राम कुलकर्णी, जि.अमरावती** ||102

26) भारतीय शिक्षण पध्दतीचा आढावा :— नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण—२०२० सह
**प्रा.शिवाजी दत्तात्रय लेंडीकर & प्रा. डॉ. दिलीप बाबुराव काळे** ||106

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

शिखांच्या 'गुरुग्रंथसाहिबा' या ग्रंथात संत नामदेवाच्या एकसष्ट अभंगांचा समावेश केला आहे. म्हणून उत्तरेत संत नामदेव यांना शीख समाज 'भगवान नामदेव' या नावाने ओळखतो. एवढे आदराचे स्थान पंजाबी लोकात आहे. हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे भूषण आहे. त्यांनी अंधश्रद्धेवर कडाडून हल्ला केला. गोरगरीब, शोषित माणसाच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पडला पाहिजे. या विचाराची कास धरली आणि त्यानुसार काम केले.

जगताच्या कल्याणासाठी संत नामदेवाने आपले जीवन समर्पित केले. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी समाजात समता पेरली. म्हणून आज ७०० वर्षे होऊन गेले. तरी पंढरपूरची आषाढी कार्तिकीची वारी वाढताना दिसते. संत ज्ञानेश्वरांनी एक ज्योत लावली तर संत नामदेवांनी लक्षावधी ज्योती लावल्या. म्हणून संत ज्ञानेश्वर म्हणतात...

इवलेसे रोप लावियेले द्वारी ।
तयाचा वेलू गेला गगनावरी ।।

कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी समाज प्रबोधन केले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत भगवी पताका खांद्यावर घेऊन घहा वर्षे देश भ्रमण करणारा पहिला संत म्हणजे नामदेव होत. कीर्तन सोहळा त्यांनी लोकांच्या आनंदासाठी सजविला. कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती केली. समाजाला अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दाखवला. हे फार मोठे अलौकिक कार्य त्यांनी केले. संत ज्ञानदेव आणि संत नामदेव महाराष्ट्राच्या मातीतीलरत्ने आहेत. त्यांच्या विचारांची जपणूक पुढच्या पिढीने केली पाहिजे. त्यांनी दिलेला विचार भविष्य काळात तरुण पिढीला तारक ठरेल. यात तिळमात्र शंका नाही.जगाला ज्ञान देण्यासाठी त्यांनी पोट तिडकीने आपले काम केले. संत ज्ञानदेव, संत नामदेव यांनी केलेल्या कामाला पुढे मोठे करण्याचे काम संत तुकाराम आणि संत एकनाथ महाराज यांनी केले. विविध जाती धर्मातील संतांनी आपल्या लेखणीतून विद्रोही लेखन केले. आपल्या भावना ते सहज व्यक्त करू शकले. ते केवळ संत ज्ञानदेव आणि संत नामदेव यांच्या कार्यामुळेच...

**संदर्भग्रंथ :**

१) संत साहित्याची फलश्रुती : ग. बा. सरदार
२) संत तुकाराम गाथा
३) संत नामदेव गाथा

**24**

# मराठी कादंबरीतील उच्च शिक्षित स्त्रीचे चित्रण

**प्रा अंशुमती राजेंद्र काहाणे**
मराठी विभाग प्रमुख (सहयोगी प्राध्यापिका),
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

**********

**प्रस्तावना**

माणसाला अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गोष्टी जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात. पण माणसाला आपला विकास साधायचा असेल तर, त्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता एकता व शिक्षण या गोष्टीची आवश्यकता असते. या सर्व गोष्टीमध्ये मानवी विकासासाठी षिक्षण हे अतिशय आवश्यक असते. शिक्षणामुळे आत्मभान येते. यामुळेच माणसाचे जीवन बदलते. शिक्षणाचे वेगवेगळे टप्पे आहेत. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, विद्यापीठीय असे काही टप्पे, यातील उच्च शिक्षणाचा टप्पा मराठी कांदबरीत स्त्री जीवनाच्या अनुशंगाने कसा आला आहे त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोधनिबधांत करण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षणाच्या पायावर उच्च शिक्षणाची इमारत उभी राहते. १९ व्या शतकाताच्या मध्यात स्त्री शिक्षण सुरू झाले. ते १९५० पर्यंत चांगले नावारूपाला आले. पण ते प्राथमिक, माध्यमिक स्तरा पर्यंतच सिमीत होते. स्वातंत्र्योतर काळात मात्र शिक्षणाचा हक्क राज्यघटनेने सर्वांना बहाल केल्याने उच्च शिक्षणात मग ते तांत्रिक, वैद्यकिय किंवा व्यावसायिक असो यामध्ये स्त्रीचा टक्का मोठया प्रमाणात वाढला आहे. १८५७ मध्ये भारतातील कोलकत्ता, मद्रास आणि मुंबई विद्यापीठाची स्थापना करून मूहर्तमेढ रोवली महाराष्ट्रात १८८५ मध्ये फग्युर्सन कॉलेज, १९४५ पीपल्स एज्युकेशन सोसायटी रयत शिक्षण संस्था,

स्वामी विवेकानंद संस्था, मराठवाडा शिक्षण संस्था, शिवाजी शिक्षण संस्था, म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर, बापूजी साळुखे, पंजाबराव देशमुख, जगदाळे मामा, स्वामी रामानंद तीर्थ, या सर्वानी उच्च शिक्षणाचा पाया भक्कम करण्याचा प्रयत्न करून, तळागाळापर्यंत उच्च शिक्षण नेण्याचा प्रयत्न केला. केंद्र सरकारने १९८६ मध्ये नवे शैक्षणिक धोरण जाहिर करून उच्च शिक्षणाला महत्व दिले या धोरणामध्ये शासनाबरोबर उच्च शिक्षणासाठी खाजगी क्षेत्र ही खुले केले. त्यामुळे शिक्षणाच्या खाजगीकरणाला सुरूवात झाली. अनेक खाजगी शिक्षण संस्था आज महाराष्ट्रात निर्माण झाल्या. या प्रक्रियेत सुरूवातील समाजसेवा म्हणून शिक्षण संस्था चालवणारे समाजसेवक आज शिल्लक राहिले नाहीत. तर ते शिक्षणसम्राट झाले. माणूस घडवण्याच्या जागी आज पैसा कमावणे आले आणि या प्रक्रियेत फार बद्दल आणि घडामोडी घडलेल्या आहेत. या सर्व घडामोडीचे चित्रण मराठी कादंबरीत दोन्ही अंगाने आले आहे. त्याचा काही कादंबरीच्या आधारे थोडक्यात आढावा, या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**मराठी कादंबरीतील उच्चशिक्षित स्त्रीचे—चित्रण**

भारत देशातील स्त्रीयांच्या जीवनमाना बाबत. ज्या बऱ्यावाईट गोष्टी झाल्या. त्याला येथील पुरूषच कारणीभूत आहेत. कारण स्त्रीयांच्या हक्कासाठी भारतीय पुरूष समाजसुधारकांनी लढा दिला आहे. त्यात स्त्रीचा सहभाग हा नग्न आहे. हाच पाढा आपणास मराठी साहित्याबाबत लागू होतो. विशेषता मराठी कांदबरी लेखनात सुरूवातीच्या काळातील सर्व कादंबरी लेखन हे बऱ्यापैकी स्त्री सुधारणे बाबतच होताना दिसून येते. मराठीतील अगदी सुरूवातीची कादंबरी 'यमुनापर्यटन' बाबा पद्मजी यांनी १८५७ साली लिहिली या कादंबरीतून तत्कालिन हिंदू विधवाची असहय अशी दुःखे मांडून हा प्रश्न साहित्याच्या माध्यमातून त्यानी समाजसेवकांकडे नेण्याचा आणि समाजाचा याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे असे काही उद्देश सांगता येतील त्यानंतरच्या काळात 'मुक्तामाळा' ही कादंबरी १८६१ साली 'लक्ष्मणशास्त्री हळबे' यांनी लिहिली या कादंबरीत स्त्रीयांच्या मानसिकतेचे दर्शन घडविले या दोन्ही कादंबऱ्या पुरूष लेखकांनी लिहिल्या आहेत. पण १८६३ मध्ये साळुबाई तांबवेकर यांनी 'चंद्रप्रभाविरहवर्णत' कादंबरीतून स्त्री—पुरूष नात्यावर वेगळया प्रकारे प्रकाश टाकून स्त्री लेखनाचा पाया घातला. पुढच्या काळात ज्या काही थोडया कांदबऱ्या लिहिल्या गेल्या त्यामध्ये समाज सुधारणा आणि विशेषता स्त्रीचे दुःख हाच विषय प्रामुख्याने दिसतो. या मध्ये ह.ना.आपटे यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी पण लक्षात कोण घेतो? 'मधली स्थिती', 'मी' 'जग' हे असेच आहे' इत्यादी कादंबऱ्यातून स्त्रीला झालेली तत्वाची जाणीव आणि स्वतःच्या उन्नतीसाठी प्रयत्न यावर प्रकाश टाकलेला आहे.

काशिबाई कानिटकर यांनी 'रंगराव' कांदबरीत एकूणच समाजाच्या विचारसणीवर आणि स्त्री जीवनावर प्रकाश टाकला आहे. या कांदबरीतून तत्कालिन समाजाचा स्त्रीषिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. प्रभाकर पंतांना सखूदूठकूला शिकवावे वाटत होते. पण त्यानी आपला हा विचार मथुराबाई जवळ बोलून दाखविला, तेव्हा त्या म्हणाल्या, 'पूरे मेल तुझ ते शिकण किकण करायच काय बाकांना इतकलि लिहिण, कुठे त्यांना रोजगार कारायला का जायच आहे? (रंगराव, पृष्ठ—२८) या संवादातून शिक्षणाकडे पाहण्याचा एका स्त्रि एक पारंपारिकपणा दिसून येतो. १९८२ ते १९०२ हा कालखंड हा स्त्रियांच्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या सुरूवातीचा काळ आहे. २० वे शतक हे सामाजिक आणि राजकीय दृष्टीने जागृतीचा कालखंड होता. १९२० च्या सुमारास स्त्रियांचे शिक्षण हा महत्वाचा सामाजिक प्रश्न बनला होता. याच काळात अनेक सुधारणा झाल्या हे शतक स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने चालना देणारे ठरले याच काळात दूर्गाबाई जोशी यांनी 'सुशिला' कांदबरी लिहिली या कादंबरीमध्ये स्त्रीच्या आचारविचारात बदल होण्यासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. तिला आचार, विचार, स्वातंत्र्य, हक्क, असावे तिचा विकास झाल्याशिवाय राष्ट्राचा विकास नाही. अशी प्रतिक्रिया या कादंबरीत आली आहे. पुढच्या काळात या विचाराची गती गतीमान झालेली दिसून येते.

स्वांत्र्योत्तर काळात म्हणजे १९६० च्या आसपास काळात स्त्री लेखिकांची पहिली पिढी फार

मोठया प्रमाणात लिहिती झाली. सर्व जाती—जमातीच्या लेखिकांना शिक्षण मिळाले आणि त्यांनी आत्मभान आले त्यांनी आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली. आपण शिक्षण घेतले, सुविधा मिळवल्या, तरी पण आपण पुरूषांच्या हातातले बाहुलेच आहोत याची जाणीव झाली आपण स्वत:च स्वत:च्या जीवनाचे शिल्पकार आहोत. आपण आपले व्यक्तिमत्व घडविले पाहिजे. असा विचार त्यांनी व्यक्त केला. त्या जागश्त झाल्या, आपले प्रश्न मांडू लागल्या स्त्री एक माणूस आहे. चूल आणि मूल, एवढेच तिचे जीवन नाही असे त्या ठणकावून सांगू लागल्या याचे चित्रण कांदबरीत आले समाजसुधारणेचे परिणाम उच्च शिक्षण युवतीने कशा प्रकारे प्रत्यक्ष कशतीत आणले याचे विवेचन मराठी कादंबरीत उच्च शिक्षित स्त्रीच्या बाबतीत आले आहे. बी.ए. झालेली 'आचला लोणकर' ही विभावरी रूिरकर यांच्या 'हिंदोळयावर' कादंबरी आलेली तरूणी तिचा नवरा विनायकराव व्यसनी असल्याने तिचे वैवाहिक जीवन अतिशय त्रासाचे होते. त्या नवऱ्याला नाकारते शिक्षिकेची नोकरी करते. गुलामगिरी, अपमान याला विरोध करते. व्यवस्थेविरूध्द बंड पुकारते आणि मला माझ्यासारखे जगता आले पाहिजे हा विचार व्यक्त करते.

प्रतिमा इंगोले यांची 'पार्टटाईम' ही कांदबरी ही उच्चविधाविभुषित अनुराधाच्या जीवनातील दु:खाचा डोंगर मांडते अलकाही उच्च शिक्षत आहे. तिचा नवरा हा सुषिक्षित बेरोजगार आहे याचा तिला पश्चताप होतो. तो ती स्वीकरते कारण तिला आत्मभान आले आहे. पण ही वेळ दुसऱ्या मुलीवर येऊ नये म्हणून ती आपल्या दीराची सोयरीक मोडण्याचा प्रयत्न करते. ती नवा विचार स्वीकारते. स्त्रीने पुरूषांच्या बंधनात का रहावे? असा तिचा साधा प्रष्न उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची मानसिकता स्पष्ट करतो.

शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' ही कादंबरी रीटाच्या माध्यमातून स्वत्व, स्वाभिमान, जागृत झालेली, अस्तित्वभान आलेली व स्त्रीच्या स्वातंत्र्यासाठी धडपडणारी एक जागृत स्त्री साकारलेली आहे. समाजाने परंपरा, रूढी यातून स्त्रीला विशिष्ट भूमिकेत अडकून ठेवले आहे. या पारंपारिक भूमिकांमधील फोलपणा या कांदबरीतील स्त्रीच्या लक्षात आला आहे. आपले कार्यक्षेत्र काय असावे? या बद्दल ती अंतर्मूख होऊन विचार करीत आहे. आपण कसे जगावे हे ती ठरवण्याचा प्रयत्न करीत आहे. पण समाजाला ते पटत नाही. रीटाचा मित्र साळवी लग्न झाले आहे. तरी परंतु रीटाशी त्याचे विवाहबाहय संबंध आहेत. तरी तिच्या मनात कुठेही अपराधेपणाची भावना नाही. पण साळवी असे समजत नाही आपले प्रेम स्वच्छ असू शकणार नाही असे म्हणतो. तेव्हा रीटा त्याला माझ्या जीवनातून दूर जा असे म्हणते, ''साळवी माझा कोणी नाही फक्त मी माझी आहे माझ जीवन माझं आहे. मी ते घडणार मला तो एक्क आहे बाकी कुणाला नाही. साळवीला तर नाहीच नाही''. या उद्‌गारात रीटाच्या अंत:स्थ स्वत्वाची जाणीव दिसून येते.

'भूमी' ही कांदबरी आशा बगे यांनी लिहिली या कांदबरीची नायिका मैथीली असे म्हणते की, समाजाने परंपरा, रूढी यातून स्त्रीला विशिष्ट भूमिकांमध्ये अडकून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. या पारंपरिक भूमिकांमधील फोलपणा मैथीलीच्या लक्षात आला आहे. त्यामुळे आपले कार्यक्षेत्र काय असावे यावद्दल ती अमंर्मूख होऊन विचार करीत आहे. स्वत्वाचा, स्वत:चा, आत्मसामर्थ्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. म्हणजे उच्च शिक्षित स्त्री जागृत झालेली व अस्तिभात आलेली स्त्री ही भूमी कांदबरीत दिसून येते.

**सारांश :**

कांदबरी लेखनातील उच्च शिक्षित स्त्रीच्या चित्रणाचा विचार करताना कांदबरीतील उच्च शिक्षित स्त्रीची बदल ती मानसिकता लक्षात येते. जसजसे कांदबरी लेखन विकसित होत गेले तसतशा कांदबरीतील उच्च शिक्षित स्त्रींया ऐशआरामाचे जीवन जगण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. उच्च शिक्षणामुळे तिच्या बोलण्यात, विचारात सामर्थ्य आल्याचे जाणवते पुरूषाला जे आवडते ते करण्यापेक्षा आपल्याला जे आवडते ते करावे असा बदलता दृष्टीकोन दिसून येतो. मराठी कांदबरीत चित्रित झालेल्या स्त्रीयांची शैक्षणिक स्थिती बदलण्याचे चित्रण आहे. पूर्व काळात शिक्षण पुरूषांची मक्तेदारी आहे. अशी भावना होती. पुढच्या काळात

आम्ही स्त्रियांच आमच्या वाईटाला कसे कारण आहोत हे सांगू लागल्या. काळानुसार स्त्रीयांच्या विचारसरणीत बदल झाला. नंतरच्या काळात उच्चशिक्षित स्त्री आपल्या हक्कासाठी, स्वतंत्र विचार व्यक्त करू लागल्या. म्हणजे मराठी कांदबरीत चित्रित झालेल्या उच्च शिक्षित स्त्रियांचा टप्या–टप्याने विकास आणि इतिहास स्पष्ट केला आहे. उच्च शिक्षित स्त्रियां चूल आणि मूल यापेक्षा पुढे जाऊन त्या समाज व्यवस्थेला आम्ही ही एक माणूस आहोत, आम्हाला ही एक व्यक्तिमत्त्व आहे. आम्हाला विकास करणेसाठी संधीची गरज आहे. असा स्पश्ट विचार व्यक्त करतात.

**संदर्भ :**

१) कुलकर्णी अनिल, शिक्षणाचे बदलते संदर्भ : साकेत प्रकाशन, औरंगाबाद,

२) नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर : साकेत प्रकाशन, औरंगाबाद,

३) आपटे हरी, पण लक्षात कोण घेतो : डायमंड पब्लिकेशन, पुणे

४) बगे आशा, भूमी : मौज प्रकाशन गृह, मुंबई

५) गोखले शांता, रीटा वेलीणकर : मौज प्रकाशन गृह, मुंबई

६) इंगोले प्रतिमा, पार्टटाइम : ग्रंथविशेष प्रतिष्ठान, पुणे, ३०

७) हळबे लक्ष्मण, मुक्तामाला : समन्वय प्रकाशन, कोल्हापूर

⌘⌘⌘

**25**

# थाट मारवा – तोंडी भैरवी

**प्रा.डॉ.जयश्री विश्राम कुलकर्णी**
संगीत विभाग,
स्व.सी.एम.कढी कला महाविद्यालय अचलपूर कॅम्प,
जि.अमरावती

**********

**प्रस्तावना –** भारतीय संगीतात प्रचलीत दहा थाट, त्यामधुन उत्पन्न होणारे राग व त्यावर आधारीत गीत, याविषयी आपण माहीती बघत आहोत.

यापुर्वी आपण थाट बिलावल, कल्याण, काफी, खमाज, आसावरी, भैरव, पूर्वी, यामधुन उत्पन्न होणारे राग व त्या रागांवर आधारीत गीते याविषयी माहीती बघीतली.

आता या पेपर मध्ये आपण मारवा,तोडी,भैरवी या थाटातुन उत्पन होणाऱ्या रागांवर व त्या रागांमधुन उत्पन होणाऱ्या गीताबददल माहिती बघणार आहोत.

**विषयः–** सर्वप्रथम आपण मारवा थाटातील रागांची माहीती बघु या.

**मारवा थाट –** हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत पध्दती मधील पं. विष्णु नारायण भातखंडे यांच्या मतानुसार राग–वर्गीकरण पध्दती मध्ये रिषभ स्वर कोमल व मध्यम स्वर तीव्र व इतर स्वर शुध्द असलेला ममारवा थाटफ होय असे मानतात.

**मारवा थाटातुन उत्पन होणारे राग खालीलप्रमाणे आहेत.**

१) मारवा
२) सोहश्वनी
३) पुरिया
४) ललीत
५) पूर्वी
६) पूर्वा
७) पूरिया कल्याण
८) मालीगौरा
९) जैत

IMPACT 8.014 iijif FACTOR

₹ 400/-

Indexed


***Publisher & Owner***

*Archana Rajendra Ghodke*

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra)
vidyawarta@gamil.com

***Edit By***

Dr. Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath, Dist.Beed 431 515


Harshwardhan Publication Pvt. Ltd. • International Multilingual Research Journal

9850203295

ISSN-2319 9318